माहितीचा अधिकार

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ अमरावती**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**
**तक्रार क्रमांक : ४३/२०१९**

तक्रारकर्ता, श्री.रंगनाथ सारंगधर चोरमागे,
मु.काठीपुरा, टाकरखेडा रोड, अंजनगाव सुर्जी,
ता.अंजनगाव सुर्जी, जि.अमरावती

विरुध्द

जन माहिती अधिकारी,
तहसिल कार्यालय, अंजनगाव सुर्जी, ता.अंजनगाव सुर्जी, जि.अमरावती

प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार,
तहसिल कार्यालय, अंजनगाव सुर्जी, ता.अंजनगाव सुर्जी, जि.अमरावती

तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : **२५.०९.२०२३**

तक्रारकर्ता : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| द्वितीय अपील आदेशाचा दिनांक | आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा दिनांक | मूळ तक्रार अर्जाचा दिनांक |
|---|---|---|
| ३१.१०.२०१८ | -- | २०.०५.२०१९ |

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) नुसार द्वितीय अपील क्र.२९३६/२०१६ दि.३१.१०.२०१८ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार दाखल केलेली आहे. सदर तक्रारीवर दिनांक २५.०९.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. त्यानुसार आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.काळे हे उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) नुसार आयोगात दाखल केलेल्या द्वितीय अपील (अपील क्र.२९३६/२०१६) मध्ये दिनांक ३१.१०.२०१८ रोजी सुनावणी घेवून " १. अपिलार्थीस अद्यापही माहिती देण्यात आली नसल्यामुळे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जोडपत्र अ नुसार मागितलेली माहिती नोंदणीकृत डाकेने विनाशुल्क पुरवावी व तसा अनुपालन अहवाल आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासुन ३० दिवसाच्या मुदतीत आयोगास सादर करावा. २ अधिनियमाचे कलम १९(८)(ख) नुसार अपिलार्थीस रु.१०००/- (रु.एक हजार फक्त) नुकसान भरपाई द्यावी. सदर नुकसान भरपाईची रक्कम सार्वजनिक प्राधिकरणाने धनादेशाव्दारे अपिलार्थीस अदा करावी. सदर

धनादेश अपिलार्थीस मिळाल्याबाबतची अपिलार्थीची पोच आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासुन ३० दिवसाच्या मुदतीत आयोगास सादर करावी. ३. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचा अर्ज नाकारला म्हणुन श्री.पी.व्ही.भुसारी तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी सध्या कार्यरत तहसिल कार्यालय अंजनगाव यांचेविरुध्द सामान्य प्रशासन विभाग महाराष्ट्र शासन परिपत्रक साप्रवि क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६ मंत्रालय मुंबई दि.३१ मार्च २००८ नुसार शिस्तभंगाची कारवाई करण्याची शिफारस करण्यात येते. प्रस्तुत आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी सदर आदेशाची एक प्रत प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वरिष्ठ अधिकारी जिल्हाधिकारी, अमरावती यांना पाठविण्यात येते. त्यांनी सदरची कार्यवाही करुन त्यासंबंधीचा अनुपालन अहवाल आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासुन ३० दिवसाच्या मुदतीत आयोगास सादर करावा." असे आदेश पारित केले होते.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेला खुलासा व तक्रारकर्ता यांचे युक्तीवादावरुन असे निदर्शनास येते की, द्वितीय अपील क्र.२९३६/२०१६ यात दि.३१.१०.२०१८ रोजी पारित केलेल्या आदेशाचे अनुपालन झाले नसल्यामुळे श्री.चोरमागे यांनी दि.१५.०५.२०१९ रोजी प्रस्तुत तक्रार अर्ज दाखल केलेला आहे. यात द्वितीय अपील अर्जाच्या आदेशात, तक्रारकर्त्यास जोडपत्र अ नुसार मागितलेली माहिती नोंदणीकृत डाकेने विनाशुल्क पुरवावी व तसा अनुपालन अहवाल आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासुन ३० दिवसाच्या मुदतीत आयोगास सादर करावा तसेच कलम १९ (८) (ख) अन्वये रु.१०००/- नूकसान भरपाई देण्याचे आदेश जारी करण्यात आले होते. तसेच तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेविरुध्द दि.३१.०३.२००८ च्या परिपत्रकानूसार शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस देखील करण्यात आली असल्याचे आढळून येते. आज झालेल्या सुनावणीत विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांना दि.११.०६.२०१९ रोजी नुकसान भरपाई प्रदान करण्यात आली असल्याचे व मुद्या क्र. १ म्हणजे जोडपत्र- अ नुसार माहिती दि.०७.०५.२०२३ रोजी प्रदान करण्यात आली असल्याचे नमूद केले आहे. मात्र ही माहिती जवळ जवळ एकूण ६० महिन्याची दिली असल्याची गंभीर वस्तुस्थिती आज सुनावणी दरम्यान समोर आली असून झालेला विलंब हा समर्थनिय असून आयोगात झालेल्या सूनावणी नंतर पारित झालेल्या आदेशाची अंमलबजावणी होण्यास तब्बल ५ वर्षे इतका कालावधी लागणे हे माहिती अधिकार कायद्याला अपेक्षीत अशी बाब नाही. ही बाब लक्षात घेता, या विलंबास जबाबदार असणाऱ्या सर्व संबंधीत कर्मचाऱ्यांना कलम १९(८)(ग) व २०(१) अन्वये अधिकतम शास्ती कार्यवाही का करण्यात येवू नये तसेच कलम २० (२) नूसार त्यांचेविरूध्द शिस्तभंगाची कार्यवाही का करण्यात येवू नये ? याबाबतचा स्वयंस्पष्ट लेखी खुलासा दि.३१.१०.२०१८ ते आज सुनावणी दिनांक पर्यंत जन माहिती अधिकारी पदावर कार्यरत असणाऱ्या किंवा जन माहिती अधिकारी व सहाय्यक जन माहिती अधिकारी म्हणून नेमणूक झालेल्या कर्मचाऱ्यांनी वरील आदेश प्राप्त झाल्यापासून २ आठवड्याच्या आत आयोगास सादर करावा.

## अंतरिम आदेश

**उपरोक्त आदेशाच्या अधिन राहून विलंबास जबाबदार असणाऱ्या सर्व जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेविरुध्द कलम १९(८)(ग) व २० (१) अन्वये अधिकतम शास्ती तसेच कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाची शिफारस का करण्यात येवू नये? याबाबतचा स्वयंस्पष्ट**



राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय अमरावती विभाग, अमरावती सत्यमेव जयते

लेखी खुलासा हा आदेश प्राप्त झाल्यापासून दोन आठवड्याच्या आत आयोगास सादर करावा.

(राहुल भा.पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ अमरावती

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक : २५.०९.२०२३**

जावक क्रमांक 630 दिनांक 06 FEB 2024